# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# ग प्रभाग कार्यालय
# कार्यपत्रिका क्रमांक - ७
# सभावृत्तांत

दिनांक - २/१२/२०१९ वेळ - सकाळी ११ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.२/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.बारणे अर्चना तानाजी – सभापती
२. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
३. मा.अभिषेक गोविंद बारणे
४. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
५. मा.निलेश हिरामण बारणे
६. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
७. मा.सविता बाळकृष्ण खुळे
८. मा.सुनिता हेमंत तापकीर
९. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१०. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, , श्री.एस.डी.निंबाळकर – आरोग्य निरीक्षक, श्री.गट्टुवार – कार्यकारी अभियंता, , बीआरटीएस, श्री.अतुल जोशी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.बाबासाहेब गलबले – कार्यकारी अभियंता,विद्युत, श्रीमती अनुश्री कुंभार – उपअभियंता विद्युत, श्री.पी पी पाटील – कार्यकारी अभियंता,श्री.मोने उमेश – उपअभियंता,जलनि:सारण, श्री.बोरसे एम डी, श्री.रोकडे जयवंत, श्रीमती गोखले एस एन – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री सतिष तायडे– कनिष्ठ अभियंता,विद्युत, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.नरोटे एस एस – उपअभियंता, स्थापत्य उद्यान श्री.कदम सी.टी – मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, थेरगाव ,श्री.डी.एन.गायकवाड – उद्यान अधिक्षक,श्री.जे.व्ही.पटेल – सहा.उद्यान अधिक्षक, इ.कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत आली.

दि. ४/११/२०१९ रोजीचे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र.६ ) कायम करणेत आला.

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली**

सुचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

दि.१/१२/२०१९ रोजी सायंकाळी दापोडी मैलाशुध्दीकरण प्लॅन्टचे काम चालु असतांना २५ फुट खोल खड्डयात पडलेल्या मजुराला वाचवतांना मातीचा ढीग पडुन श्री. विशाल हनुमंत जाधव – फायरमन यांचे अपघाती निधन झालेले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहणेत आली.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - १

दिनांक- ०२/१२/२०१९

**सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे**

**संदर्भ –** मा. संदिप वाघेरे यांचे दिनांक ८/०७/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक ८/०७/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी प्रभाग क्र.२१ मधील गंगवा चौक (नवमहाराष्ट्र विद्यालयामागे) येथे सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झालेली असुन सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले असुन नागरिक सदरचे शौचालय पाडण्याची विनंती करीत आहेत. परिसरातील बहुतांश नागरिकांनी वैयक्तिक शौचालय बांधुन घेतलेली आहेत. तरी गंगवा चौक येथील शौचालय पाडणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - २

दिनांक- ०२/१२/२०१९

सूचक- मा. निलेश बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

**संदर्भ –** मा. संदिप वाघेरे यांचे दिनांक २७/११/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक २७/११/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील कै.अनुसया नामदेव वाघेरे शाळेच्या आवारामध्ये पाणीपुरवठा विभागामार्फत २० लक्ष लीटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे काम पुर्णत्वास आलेले आहे. सदरच्या टाकीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी कार्यकारी

अभियंता कै.दिलीप गुलाबराव कुदळे असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

मा.अभिषेक बारणे – प्रभाग क्र.२३ मधील बापुजी बुवा मंदिर ते तापकिर चौक येथील दोन्ही साईडला व शाळेसमोर असलेल्या अनधिकृत टप-या काढण्यात याव्या.

श्रीमती स्मिता झगडे , क्षेत्रिय अधिकारी – सदर कार्यवाहीबाबत बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागास पत्राव्दारे कळविण्यात येईल.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ ५४ /२०१९
दिनांक - २०/१२/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.